आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१८ जून २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी येत्या १२ जुलैला निवडणूक
- देशाला जगातली तिसरी अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीनं शेतीचा विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेचा १७ वा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा
- राज्य पोलीस दलातल्या १७ हजाराहून अधिक पदांसाठी उद्यापासून मैदानी चाचणी

  **आणि**
- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ३०८ अंकांच्या वाढीसह, पहिल्यांदाच ७७ हजाराच्या वर बंद /८ सत्रात ५ हजार अंकांची वाढ

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ११ जागांसाठीच्या निवडणुकांची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगानं आज केली. विधानसभेच्या आमदारांकडून या सदस्यांची निवड होणार आहे.

या निवडणुकीची अधिसूचना २५ जून रोजी जारी होणार असून २ जुलैपर्यंत अर्ज भरता येतील. ३ जुलैला अर्जांची छाननी होईल आणि ५ जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. १२ जुलै रोजी सकाळी ९ ते ४ दरम्यान मतदान होऊन त्याच दिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल.

मनीषा कायंदे, विजय गिरकर, अब्दुल्ला दुर्राणी, निलय नाईक, अनिल परब, रमेश पाटील, रामराव पाटील, वजाहत मिर्झा, प्रज्ञा सातव, महादेव जानकर आणि शेकापचे जयंत पाटील यांचा कार्यकाळ २७ जुलै रोजी पूर्ण होत असल्यानं ही निवडणूक होणार आहे.

<><><><><>

देशाला जगातली तिसरी अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीनं शेतीचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याला आपण प्राधान्य दिल पाहिजे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी मधल्या मेहेंदीगंज इथं केलं. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता आज शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रधानमंत्र्यांनी जमा केला, यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या उपक्रमांतर्गत २० हजार कोटींहून अधिक रुपये ९ कोटी २६ लाख लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहेत.

३० हजार स्वयं सहायता गटांच्या महिलांना कृषी सखी प्रमाणपत्रांचं वाटप यावेळी करण्यात आलं. महिलांना नव्या अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि ३ कोटींपेक्षा अधिक लखपती दीदी बनवण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे. कृषी सखी ही योजना सध्या १२ राज्यात सुरु असून ती सर्व राज्यांमधे राबवण्याचं उद्दिष्ट आहे. महिलांच्या सहभागाशिवाय शेतीचा विकास होणं अशक्य आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

शेतकरी हा देशाचा कणा आहे, देशातील शेतकऱ्यांचं जीवनमान उंचावण्यासाठी आणि भविष्यातही शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यासाठी शासन कटीबद्ध असेल, असं प्रतिपादन केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी आज हिंगोली इथं केलं. हिंगोली जिल्ह्यात तोंडापूर इथल्या कृषी विज्ञान केंद्रात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

<><><><><>

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत यावर्षीच्या खरीप हंगामासाठी पीक विमा भरण्याची सुरुवात आज झाली. शेतकऱ्यांना यावर्षी देखील पीक विमा भरण्यासाठी केवळ १ रुपया द्यावा लागणार आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. विमा काढण्याची अंतिम मुदत १५ जुलै असून शेतकऱ्यांनी त्यापूर्वी पीक विमा भरून घ्यावा, असं आवाहन कृषिमंत्र्यांनी केलं आहे. खरीप हंगामासाठी भात, ज्वारी, सोयाबीन, कापसासह एकूण १४ पिकांचा विमा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

**<><><><><>**

योग आणि भरड धान्याच्या संबंधित जागरुकता निर्माण करुन लोकांचं आयुष्य सुदृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशभरातल्या सरपंचांना केलं आहे. पंचायत, शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र आणि इतर ठिकाणी योग आधारित कार्यक्रमांचं आयोजन करण्याचं आवाहन त्यांनी सरपंचांना पत्र लिहून केलं आहे.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम श्रीनगरमध्ये शेर-ए-कश्मिर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटरमध्ये होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यात सहभागी होतील, अशी माहिती आयुष खात्याचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यातल्या औसा तालुक्यातल्या लोदगा इथं आज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते भरड धान्य पेरणी करून जिल्ह्यात २०० हेक्टर क्षेत्रावर भरड धान्य पेरणी करण्याचा प्रारंभ झाला. राज्य कृषि मूल्य आयोगाचे

अध्यक्ष पाशा पटेल यांच्या पुढाकारानं जिल्ह्यात भरड धान्य उत्पादन वाढवण्याच्या उद्देशानं हा उपक्रम राबवला जात आहे.

भरड धान्याला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचं अध्यक्ष पाशा पटेल यांनी याप्रसंगी सांगितलं.

**<><><><><>**

राज्य पोलीस दलातल्या १७ हजारांहून अधिक पदांसाठी उद्यापासून मैदानी चाचणी सुरू होणार आहे. यात पोलीस शिपाई, चालक, बँडवादक, तुरुंग विभाग शिपाई अशा पदांचा समावेश आहे. यात उमेदवारांना एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करण्याची मुभा आहे. या परिस्थितीत मैदानी चाचणी एकाच दिवशी असेल तर उमेदवारांना ४ दिवसांच्या अंतरानं वेगवेगळ्या तारखा द्याव्या अशा सूचना प्रशिक्षण विभागाच्या अप्पर पोलिस महासंचालकांनी दिल्या आहेत.

**<><><><><>**

देशातल्या दोन्ही शेअर बाजार आज विक्रमी पातळीवर बंद झाले. सेन्सेक्स पहिल्यांदाच ७७ हजारांच्या वर आणि निफ्टीही पहिल्यांदाच २३ हजार ५०० अंकांच्यावर स्थिरावला. व्यवहार सुरू झाले तेव्हापासून सेन्सेक्स ७७ हजारांच्या आणि निफ्टी २३ हजार ५०० च्या वर व्यवहार करत होते. दिवसभर बाजारात हे सातत्य कायम राहिलं आणि दिवसअखेर सेन्सेक्स ३०८ अंकांची तेजी नोंदवून ७७ हजार ३०१ अंकांवर स्थिरावला.

निफ्टी ९२ अंकांची तेजी नोंदवून २३ हजार ५५८ अंकांवर बंद झाला. मतमोजणीच्या दिवसापासून अवघ्या ८ सत्रांमध्ये सेन्सेक्सनं ५ हजारांहून अधिक अंकांची वाढ नोंदवली आहे. मुंबई शेअर बाजारात ३८४ समभागांनी आज

वर्षभरातली उच्चांकी पातळी नोंदवली तर २४ समभाग वर्षभरातल्या निचांकी पातळीवर पोहोचले.

<><><><><>

वसईमध्ये आज भर रस्त्यात एका तरुणानं एका मुलीवर वार करत तिची हत्या केली. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून आरोपीला वालीव पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी कठोर कारवाई करण्याचे निर्देश मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तांना दिले असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. सखोल तपास करुन, न्यायालयात भक्कम पुराव्यानिशी बाजू मांडून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा होईल, यादृष्टीनं निर्देश दिले असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे.

आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी राज्य महिला आयोग पाठपुरावा करेल, असं आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे.

<><><><><>

कोल्हापूर जिल्ह्यातल्या प्रास्तवित शक्तीपीठ महामार्गाला विरोध करण्यासाठी आज शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. या मार्गासाठी संपादित करण्यात आलेली बहुतांश जमीन बागायती असून या महामार्गामुळे परिसरातल्या पर्यावरण आणि जैवविविधतेचा ऱ्हास होईल या कारणामुळे कोल्हापूरसह १२ जिल्ह्यातले शेतकरी याला विरोध करत आहेत.

<><><><><>

ओबीसी आरक्षणाबाबत सरकारबरोबर चर्चा करण्यासाठी कोणतंही शिष्टमंडळ पाठवण्यात येणार नाही, असा निर्णय ओबीसी आरक्षण बचाव संयोजन समितीनं घेतला आहे, अशी माहिती ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिली आहे.

<><><><><>

नीट २०२४ परीक्षेतल्या अनियमिततेच्या तक्रारीवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. परीक्षेतल्या त्रुटींचं निवारण करून निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायालयानं विद्यार्थ्यांबाबत चिंता व्यक्त करत राष्ट्रीय चाचणी संस्था आणि केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे.

<><><><><>

अमेरिकेतल्या नासा या अंतराळ संशोधन संस्थेला अभ्यास भेट देऊन आलेल्या रत्नागिरीतल्या विद्यार्थ्यांचं मंत्री उदय सामंत यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केलं. जिल्हा परिषदेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वीस विद्यार्थ्यांची या अभ्यास भेटीसाठी निवड झाली होती.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस येत्या तीन चार दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. गेल्या चोवीस तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची

शक्यता आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

येत्या २४ तासात मुंबई शहर आणि उपनगरात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता कुलाबा वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**